निगराणी

# गव्हावरील कीड आणि रोगांचे एकीकृत व्यवस्थापन

**अमोल गणोरे**
सहायक प्राध्यापक
क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक



महाराष्ट्रात गव्हाची लागवड दोन प्रकारे करण्यात येते. जिरायत तसेच बागायत म्हणून गहू रब्बी हंगामातील एक महत्त्वाचे अन्नधान्याचे पीक आहे. या पिकावर अनेक किडींची नोंद करण्यात आली असली तरी आपल्या विभागात या पिकावर मुख्यतः खोडकिडी, तुडतुडे, मावा, वाळवी इत्यादींचा व प्राण्यांमध्ये उंदरांचा प्रादुर्भाव होतो. त्यांच्या व्यवस्थापनाबाबतची माहिती या ठिकाणी दिलेली आहे.

गव्हावरील विविध किडी आणि रोगांची माहिती तसेच नियंत्रणाचे उपाय या लेखातून जाणून घेऊया. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**खोडकिडा** : या किडीचे पतंग तपकिरी रंगाचे व गवती रंगाचे असतात. पूर्ण वाढ झालेली अळी सुमारे २-३ सें.मी. असून तिचा रंग गुलाबी असतो. तिचे डोके काळे असते. या किडीच्या प्रादुर्भावाने वाढणारा मधला भाग सुकून जातो. ही कीड खोडात शिरुन खालील भागावर उपजीविका करते. त्यामुळे रोपे सुकून जातात व त्यांना ओंब्या येत नाहीत.

या किडीच्या नियंत्रणासाठी उभ्या पिकातील कीडग्रस्त झाडांचा आठवड्याच्या अंतराने २-३ वेळा मुळासकट उपटून नाश करावा. तसेच पिकाखाली फवारणी झाल्यावर उपद्रवग्रस्त शेतातील धसकटे एकत्र करुन जाळावीत. उभ्या पिकात पीक पोटरीवर येण्याच्या सुमारास हेक्टरी २ किलो कार्बारिल ५० टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.



**तुडतुडे** : हे कीटक आकाराने लहान व पाचरीच्या आकाराचे असतात. त्यांचा रंग हिरवट राखाडी असतो. तुडतुडे व त्यांची पिल्ले पानांतून रस शोषण करतात. त्यामुळे पाने पिवळी पडून ती वाळू लागतात व पिकांची वाढ खुंटते.

या किडीच्या नियंत्रणासाठी (प्रादुर्भाव दिसून आल्यावर) डायमेथोएट ३० टक्के प्रवाही ३०० मि.ली. किंवा मिथाईल डिमेटाईल २५ टक्के प्रवाही ४०० मि.ली. किंवा पेन्थिऑन ५० टक्के २०० मि.ली. किंवा कार्बारिल ५० टक्के पाण्यात मिसळणारी भुकटी १ किलो प्रतिहेक्टरी ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. किंवा कार्बारिल १० टक्के भुकटी हेक्टरी २० किलो या प्रमाणात विरघळवावी. आवश्यकतेनुसार दुसरी फवारणी/ धुरळणी १५ दिवसांनी वरीलप्रमाणे करावी.

**वाळवी किंवा उधई** : ही कीड सर्वांच्या परिचयाची आहे व या किडीचा प्रादुर्भाव पीकवाढीच्या अवस्थेत दिसून येतो. ही कीड गव्हाच्या रोपाची मुळे खाते व त्यामुळे रोपे वाळतात. संपूर्ण झाड मरते. वाळवीचा बंदोबस्त करण्यासाठी बांधावर असलेली वारूळे खणून काढावीत व त्यातील राणीचा नाश करावा. वारुळ नष्ट केल्यानंतर जमीन सपाट केल्यानंतर मध्यभागी सुमारे ३० सें.मी. खोलवर एक छिद्र करावे आणि त्यात क्लोरोपायरिफॉस २० टक्के प्रवाही हे कीटकनाशक १५ मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून वारुळात वापरावे. वरील औषधाचे ५० लिटर मिश्रण एका वारुळासाठी पुरेसे होते किंवा क्विनॉलफॉस ५ दाणेदार किंवा फोरेट १० टक्के दाणेदार किंवा कार्बोफ्युरॉन ३% दाणेदार हेक्टरी २५ किलो जमिनीत टाकावे. अथवा शेणखताबरोबर द्यावे.

**उंदीर** : उंदीर गव्हाचे फुटवे व ओंब्या तोडून खातात आणि बिळात साठवितात. उंदरांचा बंदोबस्त करण्यासाठी विषयुक्त आमिषांचा वापर करावा. हे आमिष तयार करण्यासाठी धान्याची भरड ४९ भाग, थोडे गोडे तेल व १ भाग झिंक फॉस्फॉईड किंवा ब्रोमाडिऑलॉन एकत्र मिसळावे. चमचाभर (अंदाजे १० ग्रॅम) विषारी आमिष प्लॅस्टिकच्या पिशवीत टाकून शेतातील जिवंत बिळामध्ये टाकावे.

## रोग व त्यांचे व्यवस्थापन असे करावे.

**तांबेरा** : हा हवेव्दारे पसरणारा बुरशीजन्य रोग आहे. या रोगामुळे पानांवर विखुरलेले नारिंगी रंगाचे फोड येतात, जे पुढे काळे पडतात. या फोडांमध्ये बुरशीची बीजे असतात. तांबेऱ्यापासून नुकसान टाळण्यासाठी प्रतिबंधक वाणांचा वापर करावा. (उदा. एचडी २१८९, पूर्णा, एकेडब्ल्यू ३८१ व एचआय ९७७) तांबेऱ्याची लागण दिसताच मॅन्कोझेब (डायथेन एम ४५) हे बुरशीनाशक २५ ग्रॅम, १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. रोगाची तीव्रता लक्षात घेऊन १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारण्या कराव्यात.

**काजळी किंवा काणी** : या रोगाचा प्रसार बियाण्याव्दारे होते. रोगट ओंब्यांमध्ये दाण्यांऐवजी काळी भुकटी तयार होते. या रोगाच्या नियंत्रणासाठी बियाण्यास पेरणीपूर्वी व्हिटॅव्हॅक्स किंवा कार्बेन्डाझिम या बुरशीनाशकाची २.५ ग्रॅम प्रतिकिलो याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी, तसेच शेतातील रोगट झाडे मुळासकट उपटून नष्ट करावीत.

**पानावरील करपा** : गव्हावरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी रोगाचा प्रादुर्भाव दिसताच मॅन्कोझेब हे बुरशीनाशक २५ ग्रॅम + १० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून फवारणी करावी. ■